केंद्र पुरस्कृत कृषि उन्नती योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान- अन्नधान्य पिकांकरिता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील अखर्चित असलेला केंद्र हिस्सा व समरुप राज्य हिस्सा निधी वितरीत करणेबाबत....

(लेखाशिर्ष २४०१ A५५७), (लेखाशिर्ष २४०१ A५६६)

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१८ / प्र.क्र.११ / कार्यासन ६
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: - २७ फेब्रुवारी, २०१९.

वाचा -

१) शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८ /प्र.क्र.६९ / अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ व दि.२५.०१.२०१९.
२) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग समक्रमांक दि.३.०७.२०१८ व दि.१३.१२.२०१८
३) केंद्र शासन, कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाचे पत्र क्रमांक २०-२७/२०१७-एनएफएसएम (सीए-व्ही),दिनांक १६.०५.२०१८
४) कृषि व पदुम विभागाची नस्ती क्र. राअसु -२०१८ / प्र. क्र. ७०(भाग -२)/ ४अे.

शासन निर्णय-

केंद्र पुरस्कृत कृषि उन्नती योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान(NFSM) अन्नधान्य पिकांकरिता अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी मागणी क्र. टी-५, २४०१- पीक संवर्धन, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (२१) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्न धान्य पिके (कें.पु.यो. केंद्र हिस्सा ६० टक्के)) (२४०१ A५५७), ३३- अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली रु.१५३७.९२ लाख इतका निधी, तसेच (०१) (२२) कृषि उन्नती योजना -राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्न धान्य पिके (कें.पु.यो.राज्य हिस्सा ४० टक्के) (२४०१ A५६६), ३३-अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली रु.१०२५.२८ लाख इतका निधी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे. सदर निधीपैकी वाचा क्र. २ येथील शासन निर्णयांन्वये उपरोक्त योजनेच्या केंद्र हिश्श्याकरीता लेखाशिर्ष (२४०१ A५५७), ३३- अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली रु.५२८.६४ लाख व त्यास समरुप राज्य हिस्सा म्हणून लेखाशिर्ष (२४०१ A५६६), ३३-अर्थसहाय्य याखाली रु. ३५२.४२ लाख इतका निधी कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभागास वितरीत करण्यात आलेला आहे.

केंद्र शासनाने उपरोक्त योजनेच्या केंद्र हिश्श्याकरीताचा सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील अखर्चित असलेला निधी संदर्भीत वाचा क्र.३ येथे नमूद पत्रान्वये पुनर्जिवित करुन दिलेला आहे. त्यानुषंगाने कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या वाचा क्र.४ येथील प्रस्तावानुसार सदर योजनेच्या केंद्र हिश्श्यापोटी लेखाशिर्ष (२४०१ A५५७), ३३- अर्थसहाय्य खाली रु.५११.८४ लाख (अक्षरी रुपये पाच कोटी, अकरा लाख, चौऱ्याऐंशी हजार फक्त) व त्यास समरुप आवश्यक राज्य हिस्सा म्हणून लेखाशिर्ष (२४०१ A५६६), ३३-अर्थसहाय्य खाली रु. ३५४.८९९ लाख (अक्षरी रुपये तीन कोटी, चौपन्न लाख, एकोन्नवद हजार, नऊशे फक्त) इतका निधी प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणून सचिव (कृषी), कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय निधी वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरीत व खर्च करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

३. सदर निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे. नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय तसेच साध्य झालेले भौतिक उद्दिष्टनिहाय माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास; आदिवासी विकास विभाग व कृषि व पदुम विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

४. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर लक्ष ठेवता येईल.

५. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी वैयक्तिक लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाने **वाचा** येथील क्रमांक १ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये, तसेच अनौपचारिक संदर्भ क्र.५२६/ अर्थोपाय, दि.६.१२.२०१८ व क्र.१७/२०१९/व्यय-१, दि.६.०२.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२७१२४३१५०९२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2019.02.27 13:06:50 +05'30'

रविंद्र दि.औटे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सचिव (कृषि) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य,पुणे.
३. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.

४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक / नागपूर / ठाणे / अमरावती.
५. वित्त विभाग (अर्थसंकल्प- १९), मंत्रालय, मुंबई.
६. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा मजला, विधानभवन, मुंबई.
७. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
८. कार्यासन क्र. २ व ९, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
९. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग